JETIR.ORG ISSN: 2349-5162 | ESTD Year : 2014 | Monthly Issue
JOURNAL OF EMERGING TECHNOLOGIES AND INNOVATIVE RESEARCH (JETIR)
An International Scholarly Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# निहाल स्त्रीयांच्या विकासामधील संशोधन

**रश्मी जगदीशराव सातफळे**
( शंकरलाल खंडेलवाल आर्ट, सायन्स अॅड कॉमर्स कॉलेज, अकोला )

भारतामध्ये अनेक जाती जमातीचे वास्तव आहे. हयातच अनेक आदिवासी जमातीचे वास्तव्य आहे. प्रदेश निहाय त्यांना वेगवेगळया नावाने ओळखल्या जाते. भारतात आढळून येणा-या प्रत्येक आदिवासी जमातिची वेगळी संस्कृती ,चालीरीती, प्रथा परंपरा , भाषा व वैशिष्टे आहेत . देशाच्या तुलनेत महाराष्ट आदिवासी लोकसंख्येच्या बाबतीत चौथ्या क्रमांकावर आहे. येथे चांदापासून बांदयापर्यंत अनेक अदिवासी हजारो वर्षापासून निवास करीत आहेत. त्यापैकी मेळघाटाच्या पर्वतरांगामध्ये आढळून येणारी निताल ही प्रमुख आदिवासी जमात आहे. या जमातीचे वास्तव्य प्रामुख्याने अकोला , अमरावती, बुलढाणा जिल्हातील पाच गावांचा अपवाद वगळता इतर सर्व निहालांची भाषा कोरकु आहे. निहाल जमातीच्या स्त्रीयांच्या विकासामधील संशोधन व त्यांच्या सामाजिक ,आर्थिक , सांस्कृतिक भाषिक जीवन इतर आदिवासीपेक्षा वेगळे आहे.

**निहाल जमातीमधील स्त्री जीवनातील विकास**

आदिवासी संस्कृतीतील एक महत्वाचा घटक म्हणजे कुटुंबव्यवस्थेतील स्त्री होय. अर्थात कोणत्याही समाजातील कुटुंबात स्त्री हाच केंद्रबिंदु असून ती कुटूंबासाठी अविरतपणे कष्ट करते. कष्ट अथवा श्रम करणे हे स्त्रींच्या बाबतीत अगदी लहानपणापासूनच सुरु होताना दिसते . त्यातल्या त्यात आदिवासी कुटूंबाच्या तर अर्थव्यवस्थेचा कणा असलेली आदिवासी स्त्री प्रामुख्याने जाणते. निहाल जमातीत स्त्रीयांना महत्वाचे स्थान आहे. विविध प्रसंगी पूजा करण्याचा मान हा स्त्रीयांच असतो उदा. मरीमायची पूजा , भवानीची पूजा ,बाळाची पाचवी अशा अनेक ठिकाणी स्त्रीयांना मान दिला जातो.

निहाल स्त्रीयाच्या जीवनात आपल्याला सांस्कृतिक जीवनातही विकास होतांना आढळून येतो. त्यांच्या जीवनाचा महत्वाचा घटक हा लोकनृत्य , लोकसंगीत आहे. निसर्गाच्या कुशीत मुक्तहस्ताने आनंदाचा उपभोग घेणारी ही जमात आपल्या आनंदाला वाट मोकळी करुन देण्यासाठी लोकनृत्याचा आधार घेतलेला दिसत आहे.

एखाद्या कुटूंबात मुलीचा जन्म झाल्यास आनंद मानल्या जातो. मुलगा मुलगी हयात फारसा भेद केल्या जात नाही. मुलाप्रमाणे मुलींलाही कुटूंबातील विविध प्रकारची कामे करावी लागते. लहान भावंडाचे पालनपोषण , घराची स्वच्छता , पाणी आणणे , कपडे-भांडी धुणे यांसारखी कामे मुली लहानपणापासूनच करतात. आताच्या काळात शिक्षणाच्या सुविधा वाढल्याने मुलींना शाळेत टाकल्या जाते. काही मुलींना पालक गावाच्या बाहेर पाठवत नाही. त्यामुळे नाईलाजाने त्यांचे शिक्षण अधुरे राहते. दैनंदिन व्यवहारांमध्ये निहाल जमातीच्या स्त्रीया पुरुषापेक्षा पुढे आहेत . आश्रमशाळामध्ये बोटावर मोजण्या इतक्या मुली जातात. पूर्वी निहाल जमातीत बालविवाह होत होते . आता मात्र ते प्रचलन बंद झाले आहे. तरीही वयाच्या १६ ते १८ वर्षाच्या दरम्यान एखाद्या चांगल्या स्थळाची मागणी झाल्यास मुलगी लग्न केल्या जाते. निहाल जमातीत विवाहाच्या प्रसंगी वराला वधूच्या वडिलांना ग्रोनम द्यावे लागते. निहाल स्त्रीयाला ग्रोनम देउन "औरत खरीदना असे म्हणतात . काही काही निहाल लोक गरिबीमुळे जर कोणी चांगले ग्रोनम देत असेल तर मुीलंचे भवितव्य न पाहता कुठेही लग्न लावून देतात व हयामुळे त्या स्त्रीला आयुष्यभर कष्ट सोसावे लागतात. त्या स्त्रीयांवर अनेक जबाबदा-या येउन पडतात . अपत्यप्राप्ती , मुलांचे संगोपन , कौटूंबिक जबाबदा-या सोबतच शेतीची कामेही तिला करावी लागतात. काही स्त्रीयांना दळण घेउन दुस-या गावाला जावे लागते. दुरुन पायपीट करुन पाणी भरावे लागते. मोळया देखील विकून पोट भरावे लागते . एखाद्या कुटंबात घुसमट होत असल्यास ती अन्याय सहन करीत नाही तर पाटोब्याव करुन मोकळी होते. निहाल स्त्रीया नव-यासोबत सण, उत्सव ,जत्रा ,बाजार अशाप्रसंगी त्यांची सावली सारख्या असतात . निहाल पती- पत्नीचे एकमेकांविषयीचे प्रेम हे दृढ असते. स्वातंत्र्योत्तर काळात पंचायतराज व्यवस्थेमुळे अनेक स्त्रीयांना ग्रामपंचायती , पंचायत समिती , जिल्हा परिषद अशा ठिकाणी प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळू लागली आहे.